**GOVERNMENT COLLEGE OF ENGINEERING, AMRAVATI**
(An Autonomous Institute of Government of Maharashtra)

*"Towards Global Technological Excellence"*

Phone: (0721) 2531929, 2531930
www.gcoea.ac.in

Fax: 0721-2531933
e-mail: principal@gcoea.ac.in


No: GOCEA/Canteen E tender/2023/ 1337
Date : 03/4/2023

## निविदा

**विषय:** शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती या संस्थेतील उपरगृहासाठी सेवा पुरवण्याबाबत अभिव्यक्ती स्वारस्य / निविदा

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती या संस्थेतील विद्यार्थी संख्या अंदाजे २००० हजार व अधिकारी/ कर्मचारी यांची संख्या अंदाजे १५० आहे. त्याकरता उपाय गृह सेवा पुरवण्याबाबत अनुभवी अभिव्यक्ती स्वारस्य / निविदा (online) मागवण्यात येत आहे. निविदाबाबतची सविस्तर माहिती खालील प्रमाणे आहे.

### निविदाबाबतची माहिती

| | | |
|---|---|---|
| 1. | कोऱ्यानिवेद्याची किंमत | : रुपये 100 ( ना परतावा) |
| 2. | बिनव्याजी बयाना रक्कम रुपये | : रुपये 2000 (परतावा) |
| 3. | बिनव्याजी सुरक्षा ठेव रक्कम | : रुपये एक लाख |
| 4. | निविदेचा कालावधी | : दिनांक 07 एप्रिल 2023 ते 02 मे 2023 |
| 5. | निविदे संबंधित प्री बीड बैठक | : दिनांक 12 एप्रिल 2023, दुपारी तीन वाजता |
| 6. | निविदा सादर करायचा अंतिम तारीख व वेळ | : दिनांक 02 मे 2023 दुपारी तीन वाजता |
| 7. | निवेदनेतील तांत्रिक (Technical Bid) पडताळणी तारीख व वेळ | : दिनांक 05 मे 2023 दुपारी तीन वाजता |
| 8. | निवेदनेतील **दर** (Commercial Bid) पडताळणी तारीख व वेळ | : दिनांक 08 मे 2023 दुपारी तीन वाजता |

The tender document can be downloaded from the institute's website viz. www.gcoea.ac.in and **https://mahatenders.gov.in**

**१. पात्रता निकष: Appendix-A and E चे अवलोकन करावे**

निविदा दोन प्रपत्रामध्ये (Appendix-A +B+C+D व त्या सबधित कागदपत्रे ) तांत्रिक पडताळणी मध्ये उपलोड करावे आणि Appendix-E Item नुसार दर यादी,सर्व कर धरून : दरपत्रक Commercial Bid एन्ट्री करावी.

**उपलोड करण्यापूर्वी प्रत्येक पानावर निविदा धारकाची सही असणे आवश्यक आहे**. निविदा रक्कम व बयाना रक्कम हि e challan द्वारे online भरावी. **पुर्ण प्रक्रिया ONLINE (https://mahatenders.gov.in)** करावी .

अ) Technical Bid मध्ये उपलोड करावयाची कागदपत्रे : **Appendix-A** मध्ये नमूद केलेली सर्व आवश्यक पात्रता संबंधित कागदपत्रे, कोऱ्यानिवेद्याची किंमत व बिनव्याजी बयाना रक्कम भरल्याचा पुरावा आणि **Appendix-B,C,D**

ब ) Commercial Bid मध्ये सर्व Item नुसार दर (**Appendix-E** ) व **शेवटी एकत्रित दर सर्व करासहित उपलोड/ एन्ट्री करावी.**

**२. निविदा प्रक्रिया :**

सर्वप्रथम तांत्रिक कागदपत्राच्या पडताळणीसाठी टेक्निकल बीड दिलेल्या दिनांक वेळेवर उघडण्यात येऊन (e Tendering Process) निविदेत नमूद केल्यानुसार आवश्यक कागदपत्रे सादर केली आहेत किंवा कसे याबाबत खात्री करण्यात येईल. **आवश्यक कागदपत्रे सादर न केल्याची आढळल्यास अशी निविदा अपात्र ठरविण्यात येईल. जे निविदाधारक उपरोक्त प्रक्रियेदरम्यान उपस्थित राहू इच्छिता त्यांनी वर नमूद केलेल्या ठिकाणी वेळेवर उपस्थित रहावे**. निविदा दर उघडण्यापूर्वी तांत्रिक पडताडणी मध्ये पात्र ठरलेल्या निविदा धारकाची दर पत्रिकेची नियुक्ती समितीमार्फत अर्थ छाननी करण्यात येईल. **ज्याची एकत्रित दर हा कमी असेल त्या निविदाचा विचार केल्या जाईल**. निविदा धारकाचे दर समान असल्यास प्रत्येकाला स्वतंत्रपणे चर्चेसाठी बोलवले जाईल व त्याद्वारे अंतिम निर्णय घेतला जाईल. चर्चेद्वारे सुधारित दर निश्चित करण्याचे अधिकार उपाय गृह समितीच राहतील

संबंधित सर्व कागदपत्रे ज्या नावे निविदा सादर केली आहे त्याच नावाने असणे बंधनकारक आहे तसेच तांत्रिक लिफाफे ऑनलाईन उघडल्यानंतर नियुक्त समितीने मागणी केल्यास सर्व मूळ कागदपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करणे अनिवार्य आहे. निविदा भरण्यापूर्वी निविदाधारकाने उपहार गृहाची पाहणी करावी, निविदा धारकास निविदा भरताना काही अडचण असल्यास किंवा काही बाबत स्पष्टीकरण आवश्यक असल्यास संस्थेची संपर्क साधावा.

कोणते क्षणी कुठलेही कारण न देता निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती यांना राहतील.

प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती

सहपत्रे: नमुना प्रपत्र, नियम, अटी व शर्ती व स्वयंघोषणापत्र

Appendix- A

**शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती या संस्थेतील उपहारगृहासाठी सेवा पुरवण्याबाबत**

तांत्रिक कागदपत्रे ( उपाहारगृहासाठी)

Tender No:

1. अर्जदाराचे:संस्थेचा पूर्ण नाव /
2. अर्जदार :संस्थेचा पूर्ण पत्ता /
3. मोबाईल नंबर:
4. ई:मेल-
5. आवश्यक पात्रता संबंधित कागदपत्रे

   A. उपाय गृह चालवण्याचा किमान पाच वर्षाचा अनुभव प्रमाणपत्र

   B. शॉप ॲक्ट परवाना मुंबई दुकाने व संस्था अधिनियम )1948 अन्वे संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र(

   C. अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र शासनाच्या अन्नसुरक्षा मानके अधिनियम 2006 अंतर्गत परवाना

   D. अमरावती महानगरपालिका परवाना

   E. PAN/TAN/TIN No नंबर नोंदणी प्रमाणपत्र

   F. आर्थिक 2021- 22 वर्षाचे आयकर भरल्याचा पुरावा जोडावा अथवा वार्षिक आर्थिक उलाढाल यासाठी खर्च उत्पन्न किंवा सबंधित लेखापालाचे चे प्रमाणपत्र

   G.निविदा शुल्क भरणा केल्याची पावती

   H. अनामत रक्कम

   I. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र व जीएसटी भरण्याची पावती

   J. आधार कार्ड क्रमांक लागू असल्यास :

6. अर्जदार विरुद्ध पोलीस तक्रार नसल्याचे ना हरकत प्रमाणपत्र तसेच काळे यादीत अंतर्भूत नसल्याचे स्वयंघोषित पत्र
7. निविदा धारकाचे कार्यालय PMRDA/ संस्था स्थापित असल्याचे मुख्यालय असणे आवश्यक आहे त्यासंबंधी पुरावा जोडावा
8. अटी व शर्ती मान्य असल्याचे स्वयंघोषणापत्र
9. बिनव्याजी बयाना रक्कम रुपये २००० =०० भरल्याचा पुरावा
10. वार्षिक उलाढाल रु १० लक्ष, सबंधित पुरावा

सही( नावासह ) शिक्का /
निविदा भरणाऱ्यांची

## Appendix -B
## उपहारगृहसाठी सेवा पुरवण्याबाबत
## नियम अटी व शर्ती

1. उपहारगृहात पुरवण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थाची गुणवत्ता नियमितपणे तपासण्यात यावी.
2. उपाय गृह चालवण्यासाठी चा सेवा पुरवठा आदेश मिळाल्यानंतर दहा दिवसात उपाहारगृह सुरू करणे बंधनकारक राहील
3. उपाहारगृहातील सेवा विद्यार्थी अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी ऐच्छिक असेल. तसेच उपाहारगृहातील सेवा मागणीनुसार अभ्यागत गटांना उपलब्ध करून देणे बंधनकारक असेल
4. संस्थेतर्फे स्वयंपाक घर, भोजन कक्ष, पाणी व विद्युत पुरवठा इत्यादी सुविधा पुरविण्यात येतील.
5. उपग्रह चालकास प्रथम वर्षात कमीतकमी **प्रतिमाह रुपये ७०००= ००,** (रु सात हजार) ( संस्था स्थापित असलेल्या मुख्यालयातील शासकीय नियमानुसार आकारण्यात येईल, PWD मान्येच्या अधीन राहून ) येणाऱ्या प्रत्येक वर्षात दहा टक्के वाढीव भाडे भरावे लागेल . online e Tendering प्रक्रिया मध्ये **रुपये ७०००= ०० हि tender Value आहे.**
6. उपायगृहासाठी अनामत रक्कम रुपये १०००००=०० (अक्षरी एक लाख ) इतकी रक्कम / धनाकर्ष संस्थेत भरावा लागेल . अनामत रक्कम भरल्यावर रु ५०० च्या स्टॅम्प पेपरवर अटी व शर्ती मान्य झाल्यानंतरच करार अस्तित्वात येईल याची नोंद घ्यावी
7. कराराची मुदत निविदा मान्य झाल्यापासून ११ महिन्यासाठी असेल ,(जास्तीस जास्त **तीन** वर्षासाठी असेल), करार कालावधीमध्ये उपाहारगृह चालकाची सेवा व दर्जा मानकाप्रमाणे नसल्यास आणि दोनदा सूचना देऊनी मानकाप्रमाणे दर्जा सुधारला नाही तर पुढील प्रत्येक प्रकरणी उपाय गृह चालकास रुपये २००० =०० इतका दंड आकारण्यात येईल आणि वारंवार सूचना देऊनही मानकाप्रमाणे दर्जा सुधारला नाही तर सेवा खंडित करण्याचे अधिकार किंवा संपूर्ण वर्षातील कामाचे मूल्यमापन करून पुढील वर्षासाठी मुदतवाढ देण्याचे अधिकार माननीय प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती यांना राहील. सदरील सेवा खंडित करण्यासाठी ३० दिवसाची आगाऊ सूचना उपाहारगृह चालकास देण्यात येईल/ तसेच उपाहारगृह चालकाला सेवा खंडित करण्याची असल्यास ९० दिवसाची आगाऊ सूचना उपहारगृह समिती शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती यांना देणे बंधनकारक राहील
8. उपहारगृहातील ओल्या व सुक्या कचऱ्याची स्वतंत्र विल्हेवाट लावण्याची जबाबदारी उपहार गृह चालकाची राहील. सांडपाण्याच्या ड्रेनेजमध्ये उपहार गृहाचा कचरा आढळल्यास त्याच्या साफसफाइ साठी खर्च उपाय गृह चालकास करावा लागेल तसेच उपरगृहातील सभोवतील परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी उपाय चालकाची असेल.
9. उपहारगृहामध्ये मद्यपान धूम्रपान व इतर अमली पदार्थाचे सेवन करण्यास अथवा करू / ,करण्यास सक्त मनाई असेल. सदरील बाब उपाय गृह समितीस निदर्शनास आल्यास उपाय गृह चालकास रुपये २०००=०० इतका दंड आकारण्यात येईल आणि वारंवार सूचना देऊन सुद्धा सुधारणार न झाल्यास सेवा खंडित करण्याचे अधिकार प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती यांना राहतील.

10. संस्थेतील उपहार गृह समिती उपहार गृहास अकस्मित भेट देऊन खाद्यपदार्थ, स्वच्छता मानकानुसार दर्जा तसेच सेवा बाबत तपासणी करतील , त्यानुसार प्राचार्याच्या सूचनेप्रमाणे दर्जा सुधारणे उपाय गृह चालकास बंधनकारक राहील.
11. उपहार गृहाचा उपयोग निवासस्थान म्हणून करता येणार नाही.
12. उपहार ग्रहाची वेळ सकाळी ८.०० ते सा. ७.०० अशी राहील.
13. संस्थेच्या परिसरात बैठका व इतर कार्यक्रमाच्या वेळी मागणीनुसार उपहार गृहाच्या सेवा पुरवणे बंधनकारक राहील.
14. उपाहारगृहात बाल कामगार कायद्यानुसार बाल कामगार ठेवता येणार नाहीत.
15. उपहार गृहातील काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणे बंधनकारक राहील.
16. उपाहारगृहातील काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संपूर्ण माहिती संस्थेमध्ये सादर करावी लागेल. तसेच उपहार गृहातील काम करणाऱ्या कर्मचारी विरुद्ध कोणत्याही गुन्हा पोलीस स्टेशनमध्ये दाखल नाही याची खात्री द्यावी लागेल. नवीन कर्मचारी नियुक्तीच्या आधी त्याबाबतची परवानगी संस्थेकडून घ्यावी लागेल.
17. करार कालावधीत कोणत्याही कारणास्तव उपाहारगृह चालकाची सेवा खंडित करण्यात आली व नवीन उपहारग्रह चालकाची नियुक्ती करून काम करून घ्यावे लागले तर अशावेळी अशा वाढीव खर्चाची वसुली जुन्या उपहारगृह चालकाच्या सुरक्षा रकमेतून करण्यात येईल.
18. उपहारगृहातील आणि भोजन कक्षातील वॉश बेसिन, पंखे ,खिडक्या ,दिवे टाइल्स फरश्या खुर्च्या व टेबल स्वच्छ ठेवणे बंधनकारक राहील.
19. या करारादवारे सोपविण्यात आलेले उपाहारगृह चालकास इतर कोणत्याही कंत्राटदारा कडे अथवा एजन्सीकडे हस्तांतरित करता येणार नाही व सोपविता येणार नाही. सदरील बाब उपहारगृह समितीस निदर्शनास आल्यास सेवा खंडित करण्याचे अधिकार प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती यांना राहतील.
20. उपहारगृह सेवा पुरवण्याचा करार अमरावती शहरा पुरता न्यायाधिकार कक्ष (Legal Jurisdiction ) मर्यादित राहील.
21. उपाहार गृह चालकाने स्वतःच्या खर्चाने स्वयंपाक गृहाचा पूर्ण भाग, स्वयंपाकगृहाचा ओटा भांडी धुण्याची जागा, धान्याचे भंडार गृह , गॅस स्टोरेज , स्वयपाक गृहाच्या टाइल्स तसेच ओटा प्लॅटफॉर्म नियमितपणे स्वच्छ /ठेवणे बंधनकारक राहील. कोणत्याही प्रकारची दुर्गंधी, घाणेरडे डाग भिंतीवर अथवा फरशीवर असता कामा नये. स्वच्छतेसाठी स्टॅंडर्ड क्लिनिंग मटेरियल चा वापर करावा. दोनदा सूचना देऊनी अस्वच्छता दिसून आल्यास रुपये १०००=०० इतका दंड आकारण्यात येईल.
22. उरलेले शिळे अन्न,खरकटे, ब्लॅक प्लास्टिक, डिस्पोजेबल बॅग मध्ये बंद करून त्याची विल्हेवाट शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती यांच्या इमारतीच्या आवाराबाहेर करण्याची जबाबदारी संपूर्णपणे उपाहार गृह चालकाची राहील. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती या इमारतीच्या आवाराबाहेर कचऱ्याची विल्हेवाट लावताना महानगरपालिका कडून कोणत्याही स्वरूपाची तक्रार आल्यास ,त्याचे निकारण करण्याची जबाबदारी सर्वस्वी उपहारगृह चालकाची राहील. कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट न केल्यास रुपये १०००=०० दंड आकारण्यात येईल.

23. उपाहारगृह चालकांनी सेवा पुरवताना उच्च दर्जाची अन्नाची गुणवत्ता, स्वच्छता आणि सर्व सेवांमध्ये कोणत्याही वेळी कोणत्याही प्रकारची कमतरता न करता सातत्याने **उच्च दर्जाची** सेवा पुरवणे आवश्यक राहील.
24. आजारी विद्यार्थ्यांची करता त्यांच्या आवश्यकतेनुसार खाद्यपदार्थ त्यांना घरपोच / वस्तीगृहामध्ये पोहोचविणे.
25. उपाहारगृह साठी वापरण्यात येणाऱ्या गॅस सिलेंडरची व्यवस्था व खर्च स्वतः उपाहारगृह चालकास करावा लागेल तसेच गॅस सिलेंडरपाईपलाईन याबाबत काही दुर्घटना घडल्यास / त्याची सर्वस्वी उपाहारगृह चालकाची राहील. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती जबाबदार राहणार नाही याची नोद उपहार गृह चालकाने घावी. तसेच याबाबत होणारा खर्च उपहार गृह चालकास करणे बंधनकारक राहील.

दिनाक नाव व सही

# Appendix-C

### परिशिष्ट-कंत्राटदाराने द्यावयाचे हमीपत्र

मी_______________________________________________________________________________________________पदनाम
__________वय______________________राहणार________________________________________
________________ संस्थेचे नाव__________________________________________________
पत्ता_____________________________________________________________________________
______________________________

खालीलप्रमाणे प्रतिज्ञा करतो की..

१. माझ्या एजन्सी/ कंपनीचे कोणत्याही व्यक्ती सोबत कोणत्याही प्रकारची भागीदारी / शेअर किंवा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबंध नाही.

२. माझी एजन्सी/ कंपनी दिवाळखोर म्हणून घोषित झालेला नाही.

३. माझ्या एजन्सी/ कंपनीने अनुचित कामगार प्रथेचा अवलंब केलेला नाही.

४. माझ्या एजन्सी/कंपनीने कोणतेही गैरकृत्य करुन किंवा नैतिक अधःपतनाचे कोणतेही कृत्य केलेले नाही.

५. माझ्या एजन्सी/कंपनीने कोणतेही गुन्हेगारी कृत्य केलेले नाही. तसेच कंपनी विरुद्ध कोणत्याही न्यायालयात दावा दाखल झालेला नाही.

६. माझ्या एजन्सी/ कंपनीने आयकर/विक्रीकर व फेरा इ. कायद्याचे उल्लंघन केलेले नाही. त्याबाबत माझ्या एजन्सी/कंपनी विरुध्द खटला किंवा दावा दाखल झालेला नाही.

७. माझ्या एजन्सी/कंपनीला शासकीय / स्थानिक संस्था यांनी काळ्या यादीत टाकलेले नाही.

८.माझ्या एजन्सी/कंपनीला_________________________________________________ संस्थेने __/__/__ ते __/__/__. या कालावधीसाठी काळ्या यादीत टाकले होते. सदर कालावधी संपला असल्याने माझ्या कंपनी निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यास पात्र आहे.

९. माझ्या एजन्सी/ कंपनीला सेवेच्या स्वरुप व व्याप्ती दिल्याप्रमाणे तसेच करारनाम्यातील अटी व शर्ती प्रमाणे सेवेचा दर्जा चांगला नसल्यास अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव मक्ता रद्द केल्यास माझी एजन्सी/कंपनी सदर ठिकाणी पुरविलेल्या आवश्यक सेवेसाठी व इतर कामासाठी केलेल्या खर्चाची मागणी करणार नाही.

१०. पात्रतेबाबतचे दाखल केलेले कागदपत्रे सर्व खरी आहेत. त्यात काही फसवेगिरी आढळून आल्यास किंवा तसे करार काळात आढळून आल्यास माझी एजन्सी/कंपनी त्यासाठी जबाबदार राहू व अपात्र ठरु व माझी एजन्सी/कंपनी अशा परिस्थितीत कोणतीही नोटीस न देता पुरविण्यात आलेली सेवा रद्द करण्याचा अधिकार प्राचार्य, (संस्थेचे नाव) यांना राहील तसेच मी निविदेसोबत जमा केलेली बयाणा रक्कम व (संस्थेचे नाव) कार्यालयाकडे जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्याचा प्राचार्य, (संस्थेचे नाव) यांना अधिकार राहील व ते मला मान्य राहील.

ठिकाण : निविदाधारकाचे नाव व सही_________________________

दिनांक: पत्ता: ________________________________________

दुरध्वनी/मोबाईलक्रमांक: ______________________________

Appedendix-D

# स्वयंघोषणापत्र

प्रमाणित करण्यात येते की, (संस्थेचे नाव) यांनी उपहारगृह सेवापुरवठा सेवेविषयी घालून दिलेल्या अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला/आम्हाला उपहारगृह सेवापुरवठा करण्याची संधी मिळाल्यास निविदेतील व करारातील अटी व शर्तींची पूर्तता करण्याची जबाबदारी माझ्यावर /आमच्यावर असून त्या माझ्यावर/ आमच्यावर बंधनकारक राहतील, वरील अटी व शर्तीचा जर माझ्या/आमच्याकडून भंग झाला तर माझी/ आमची अनामत रक्कम जप्त करण्याचा अधिकार प्राचार्य, (संस्थेचे नाव) यांना राहील. तसेच त्यामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देखील करण्यास मी/आम्ही जबाबदार राहीन. तसेच उपहारगृह सेवा पुरवठा कालावधीत सेवाअंतर्गत कामगाराकडून संस्थेच्या कोणत्याही मालमत्तेचे नुकसान झाल्यास, तसेच शासकीय नियमांचे/ कायद्याचे पालन न झाल्यास त्याची भरपाई करण्याची जबाबदारी माझी/ आमची राहील.

ठिकाण : निविदाधारकाचे नाव व सही____________________

दिनांक: पत्ता:______________________________

दुरध्वनी/मोबाईलक्रमांक:____________________

**Government College of Enginering Amravati**

(उपहारगृहासाठी) **Appendix E**

१.अर्जदाराचे/संस्थेचे पूर्ण नाव:

२.अर्जदार/संस्थेचा पूर्ण पत्ता:

खाद्य पदार्थांचे नाव व दराचे विवरणपत्र

| अ. क्र. | पदार्थांचे नाव (परिमाण) | दर नमूद करावा |
|---|---|---|
| ०१ | चहा (६०मि. लि.) १ कप | |
| ०२ | चहा(१/२कप) | |
| ०३ | कॉफी (६०मि. लि.) १कप | |
| ०४ | दूध (६०मि. लि.) १कप | |
| ०५ | ग्रीनटी /लेमन टी | |
| ०६ | कोल्ड कॉफी | |
| ०७ | लस्सी (२५०मि. लि.) | |
| ०८ | समोसा (५०ग्रॅम) (१नग) | |
| ०९ | वडापाव (५०ग्रॅम) (१वडा व१पाव) | |
| १० | भजी (५०ग्रॅम) | |
| ११ | पोहे (१प्लेट) | |
| १२ | उपमा (१प्लेट) | |
| १३ | शिरा (१प्लेट) | |
| १४ | पॅटीस (७५ग्रॅम) | |
| १५ | साधा डोसा | |
| १६ | उत्तपा | |
| १७ | मिसळपाव ( २पाव) | |
| १८ | इडली सांबार (२नग) | |
| १९ | उडीद वडा सांबार(२नग) | |
| २० | पेपर डोसा | |
| २१ | आलू पराठा | |
| २२ | राईसप्लेट (४चपाती, २भाज्या, भात व डाळ) | |
| २३ | पुरीभाजी (४पुरी) | |
| २४ | दालराईस (१प्लेट) | |
| २५ | व्हेजपुलाव (१प्लेट) | |
| २६ | अंडा ऑम्लेट (२अंडी) | |
| २७ | अंडा भुर्जी (२अंडी) | |
| २८ | साबुदाना खिचडी (१प्लेट) | |
| २९ | पावभाजी (२पाव) | |
| ३० | साबुदाना वडा (२नग) | |
| ३१ | दहीवडा (२वडे) | |
| ३२ | पाणी बाटली | |
| ३३ | बिस्कीट | |
| ३४ | वेफर्स | |
| ३५ | क्रिमरोल | |
| ३६ | आईसक्रीम | |
| ३७ | कोल्ड्रिंक्स | |

एकूण रक्कम (आकडी) :

अक्षरी :

दिनांक:

निविदा भरणाऱ्याची नाव व सही व शिक्का